# शुध्दीपत्रक

## ठाणे महानगरपालिका, ठाणे.

## जाहिरात (संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी)

ठाणे महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडील परिचारिका (GNM) या संवर्गातील खालील पदे करार पध्दतीने भरण्यासाठी पात्र व इच्छुक उमेदवारांनी ठाणे महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभाग, ठाणे महानगरपालिका भवन चंदनवाडी, अल्मेडा रोड, पांचपाखाडी, ठाणे ४००६०६ या पत्यावर दि. २८.०२.२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता थेट मुलाखतीसाठी उपस्थित रहावे. तसेच अर्जासोबत नमूद केलेली प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

अ) शैक्षणिक अर्हता:-

| पदाचे नांव | पदसंख्या | शैक्षणिक अर्हता | मानधन रक्कम रु. | आरक्षण | मुलाखत दि. | वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|---|---|
| परिचारिका | १६ | १२ वी पास व जनरल नर्सिंग मिडवाईफरी (GNM) परिक्षा उत्तीर्ण | रु. २०,०००/- | अनु. जाती-०<br>अनु.जमाती-२<br>विजा (अ)-०<br>भज (ब)-१<br>भज (क)-०<br>भज (ड)-१<br>इमाव-२<br>खुले-९<br>विमाप्र-१ | २८.०२.२०१९ | जाहिरातीमध्ये निर्देशित केल्याप्रमाणे |

**टिप - उपरोक्त पदाच्या थेट मुलाखती दि. २२.०२.२०१९ रोजी घेण्यात येणार नसून दि.२८.०२.२०१९ रोजी घेण्यात येणार आहेत याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

वयोमर्यादा -:
उमेदवाराचे वय दि.२८.०२.२०१९ रोजी किमान १८ वर्षे व कमाल ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे (मागास वर्गीयांसाठी ५ वर्षाची शिथीलता)

टिप :- १) उमेदवारांना मिळालेले गुण जर समान असतील तर वयाने ज्येष्ठ उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.
२) भरती प्रक्रयेचा संपूर्ण तपशील ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यासाठी वैयक्तिक स्वरुपात उमेदवारांनी पत्रव्यवहार करु नये अथवा संपर्क साधु नये.
३) अनुभवाकरीता फक्त पूर्ण महिन्याचा कालावधी विचारात घेण्यात येईल. तसेच अनुभव हा तीन महिन्यांच्या पटीमध्ये ग्राहय धरण्यात येईल.
४) अर्ज स्विकारण्याची वेळ सकाळी १०.०० ते दुपारी २.०० पर्यंतच राहील.

**५) महापालिका सेवेमध्ये काम केलेल्या उमेदवारांना वयाची अट शिथिलक्षम.**

**<u>ब) अटी व शर्ती :-</u>**

१) जाहिरातीमध्ये प्रसिध्द केलेल्या पदांमध्ये अंशतः बदल करणे , पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संरचनेमध्ये वाढ किंव घट तसेच निवडप्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उचित पध्दतीचा अवलंब करुन उमेदवाराची चाळणी करण्याचे सर्व अधिकार महापालिकेने राखुन ठेवलेले आहेत. याबाबत उमेदवाराला कोणतीही तक्रार अथवा दावा सांगता येणार नाही.

२) उमेदवारांनी जाहिरातीला अनुसरुन आपले अर्ज या कार्यालयात मुलाखतीकरीता येताना सोबत आणवयाचे आहे.

३) मुलाखत सार्वजनिक आरोग्य विभाग, ४था मजला, ठाणे महानगरपालिका प्रशासकीय भवन, डॉ.अल्मेडा रोड,पांचपाखाडी, ठाणे पश्चिम येथे आयोजित करण्यात येईल.

४) सामान्य प्रशासन विभाग शासन अधिसुचना क्र. एसआरव्ही-२०००/प्रक्र.१७/२०१०/१२, दि.२८.०३.२००५ व शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही-२०००/प्रक्र.१७/२०१०/१२, दि. ०१.०७.२००५ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये दि.२८.०३.२००५ नुसार रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेली अपत्यांची संख्या बाबत लहान कुटुंब असल्याचे सोबतच्या नमुन्यात प्रतिज्ञापत्र मुलाखतीच्या वेळेस सादर करणे आवश्यक आहे.तसेच अविवाहित असणा-या अर्जदारांनीही विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे व तशी नोंद फॉर्म भरताना संबंधित रकान्यात करणे आवशक आहे.

**५) उमेदवारांनी अर्जामध्ये नमूद केलेल्या विविध प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती मूळ प्रमाणपत्राच्या आधारे कागदपत्र तपासणीच्या वेळी तपासण्यात येईल. सदर प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती (Original Copy) कागदपत्र तपासणीच्या वेळी उपलब्ध करुन देणे उमेदवारांवर बंधनकारक राहील.त्यामधील प्रमाणपत्रे खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधित उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल.**

**६)** उमेदवारांची शैक्षणिक पात्रता, अनुभव व मुलाखतीत मिळविलेल्या एकत्रित गुणांच्या आधारे व त्या उमेदवारांची कागदपत्रे वैध ठरल्यास अंतिम निवड यादी तयार केली जाईल. पदांच्या उपलब्धतेनुसार उमेदवारांची अंतिम निवड यादी तयार केली जाईल.

**७)** दि.२२.०२.२०१९ या दिवशी उमेदवाराचे वय वयोमर्यादेमध्ये असणे आवश्यक आहे.

**८)** स्थानिक पोलिस स्थानकाचा संपुर्ण पत्ता अर्जावर नमूद करण्यात यावा.

**९)** उमेदवारांस मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे.

**१०)** सदर जाहिरातीनुसार भरती स्थगित करणे किंवा रदद करणे, अंशतः बदल करणे, प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रदद करण्याचा अधिकार प्रशासन राखुन ठेवत आहे.

११) उमेदवारांस मुलाखतीस स्वखर्चाने यावे लागेल.

**१२)** एखादया अर्जदाराने त्याची निवड करणेसाठी निवड समिती अध्यक्ष, सदस्य तसेच अधिका-यांवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष राजकीय अथवा अन्य प्रकाराने दबाव आणल्यास अथवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन अपात्र ठरविण्यात येईल.

१३) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमदवारांने दिलेली माहिती/अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची निवड/नियुक्ती तात्काळ रदद करण्यात येईल.

१४) मुलाखतीस ५०पेक्षा जास्त उमेदवार असल्यास महिल्या ५० उमेदवारांची मुलाखत नियोजित दिवशी होईल व पुढील सर्व उमेदवारांना टोकन क्रमांक देऊन नंतरची मुलाखतीची तारीख देण्यात येईल.

क) **<u>अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सुचना :-</u>**

अ)  जाहिरात काळजीपुर्वक वाचावी.

ब)  अर्जाचा नुमुना www.thanecity.gov.in या संकेतसथळावर दि. २०.०२.२०१९ पासून दि.२७.०२.२०१९ पर्यंत उपलब्ध राहिल.

क) ज्या पदासाठी उमेदवार अर्ज भरणार  आहे त्या पदाची पात्रता जाहिरातीमध्ये काळजीपुर्व वाचावी. लहान कुटुंब असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्राचा नमुना सदर संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ड)  उमेदवाराने अर्ज भरतेवेळी सर्व आवश्यक कागदपत्रे व स्वतःचा अलीकडील काळातील पासपोर्ट साईज फोटो व विहित केलेला अनुभवाचा दाखला स्वतःजवळ असलेची खात्री करावी.

इ)  उमेदवाराने अर्जासोबत माहिती सादर करताना सतत कार्यान्वीत असलेला भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करावा.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी,<br>
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**ठिकाण :- ठाणे.**<br>
**दि.   /     / २०१९**

# अर्जाचा नमुना

## . . . . . . . . . . . . . . . या पदाचा अर्ज

| |
|---|
| **उमेदवाराचा फोटो**<br><br>**कृपया येथे पासपोर्ट साईज फोटो चिकटवा** |

**प्रति,**
**मा. आयुक्त सो**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

संपुर्ण नावः- ---------------------------------------------------------------------------------------------------------------

पत्रव्यवहाराचा पत्ताः---------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्र.-----------------------------------------------------------

**(लागू श्रेणी समोर √ अशी खुण करा.)**

जन्मतारीख :-

| तारीख | महिने | वर्षे |
|---|---|---|
| | | |

दिनांक २८ / ०२ /२०१९ रोजीचे वय

| दिवस | महिने | वर्षे |
|---|---|---|
| | | |

लिंगः- पुरुष स्त्री विवाहीत अविवाहीत किती अपत्ये आहेत

शैक्षणिक अर्हताः- (टिपः- ज्या पदासाठी उमेदवाराने अर्ज केला आहे त्या पदाची किमान शैक्षणिक पात्रता नमूद करणे आवश्यक आहे.)

| अ.क्र. | शिक्षण | शाळा /मंडळ/विद्यापिठाचे नाव | उत्तीर्ण महिना व वर्षे | टक्केवारी/श्रेणी |
|---|---|---|---|---|
| १. | एस.एस.सी | | | |
| २. | एच.एस.सी | | | |
| ३. | पदविका | | | |
| ४. | पदवी | | | |
| ५. | पदव्युत्तर (पदविका) | | | |
| ६. | पदव्युत्तर (पदवी) | | | |
| ७. | इतर | | | |

**कामाचा अनुभवः- एकुण अनुभव --------------- वर्षे ----------- महिने**

| अ.क्र. | संस्थेचे नाव | पदाचे नाव | कालावधी | |
|---|---|---|---|---|
| | | | दिनांकापासून | दिनांकापर्यंत |
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |

उमेदवारास पुर्वी फौजदारी अथवा दिवाणी प्रकरणात शिक्षा झाली होती का? (होय /नाही)
झाली असल्यास त्याचा तपशिल नमूद करण्यात यावा व न्यायालयीन/निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी.
उमेदवारा विरुध्द पोलिस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित /प्रस्तावित आहे का? (होय /नाही) असल्यास त्याबाबतचा तपशिल द्यावा.

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ नुसार
अर्जासोबत जोडावयाच्या लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापनाचा नमुना
प्रतिज्ञापन
नमुना अ (नियम ४ पहा)

मी.श्री/श्रीमती/कुमारी----------------------------------------------------------------------------------------------------------
श्री.-------------------------------------------------------------------------यांचा /यांची /मुलगा/मुलगी/पत्नी,वय-----------------
वर्षे
राहणार--------------------------------------------यावद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करतो /करते की,
१.मी---------------------------------------------------------------------------या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.
२.आज रोजी मला-------------------------(संख्या) इतकी मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ------------------ आहे. (असल्यास,जन्मदिनांक नमूद करावा.)
३.हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.
स्थळ (--------------------------)
दिनांकः- अर्जदाराची सही

मी या अन्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहिर करतो/करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार ती पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यkस माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास त्यांबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

आपला/आपली विश्वासू

ठिकाणः- ठाणे
दिनांकः- / /२०१८

अर्जदाराची सही
(अर्जदाराचे नांव)

सेवायोजन कार्यालयाचा नोंदणी क्रमांक (असल्यास) :-
प्रकल्प अधिकारी कार्यालयाचे नोंदणी क्रमांक (असल्यास) :-
स्थानिक पोलिस स्टेशनचा पत्ताः-

**सोबत प्रमाणपत्राच्या सत्यप्रती जोडण्यात येत आहेत. (लागू रकान्यात √ अशी खुण करा.)**

१.जन्मतारिख दाखला.- ( )

२. शिक्षण (उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र) - ( )

३. शिक्षण (मार्कशिट) - ( )

४.अनुभवाचा दाखला - ( )

५.शासन निर्णयानुसार जातीचा दाखला - ( )

६.नॉन क्रिमीलेयर दाखला - ( )

७.नोंदणी प्रमाणपत्र. - ( )

८. नोंदणी नुतनीकरण प्रमाणपत्र - ( )

९.रहात्या घराचा पत्ता दर्शविणारे एमटीएनएल,एमएसइबी बिल,रेशन कार्ड, अथवा आधार कार्ड - ( )

**आपला/आपली विश्वासू**

**अर्जदाराची सही**
**(अर्जदाराचे नांव)**